**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १९ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. क्रोएशियाचा दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी मायदेशी परतले.
2. राज्यातील प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश.
3. जिवंत सातबारा' मोहिमेला अमरावती विभागात चांगला प्रतिसाद.
4. ख्यातनाम वन्यजीव अभ्यासक मारुती चितमपल्ली यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार.

---------------------------------------

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला पाच दिवसांचा परदेश दौरा पूर्ण करून आज क्रोएशिया इथून मायदेशी परतले. पंतप्रधान मोदी यांचा क्रोएशियाचा हा पहिलाच दौरा होता. त्यांच्या या दौऱ्यात झालेल्या उच्चस्तरीय भेटींनी दोन्ही देशांमधल्या भविष्यातल्या धोरणात्मक सहकार्याचा मार्ग मोकळा केला. पंतप्रधान मोदी यांनी क्रोएशियाचे पंतप्रधान आंद्रेज प्लेन्कोविच यांच्याशी प्रतिनिधीमंडळ पातळीवर चर्चा केली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात जागतिक शांतता, लोकशाही मूल्य, व्यापार, तंत्रज्ञान आणि परस्परांच्या संस्कृतीमध्ये सहकार्य वाढवण्याप्रति सामायिक वचनबद्धतेवर भर दिला. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय व्यापार अधिक दृढ करण्यावर आणि लवचिक, विश्वासार्ह पुरवठा साखळी तयार करण्यावरही सहमती दर्शवली. परस्पर संबंध आणखी मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठं पाऊल म्हणून, दोन्ही देशांनी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. दरम्यान क्रोएशिया चे लोक योग दिवस उत्साहात साजरा करतील अशी अपेक्षा मोदींनी व्यक्त केली-

*(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी -१६ सेकंद)*

*यहाँ पर योग की लोकप्रियता को मैंने स्पष्ट रूप से अनुभव किया है। 21 जून को अंतर्राष्ट्रीय योग दिवस है और मुझे विश्वास है कि हमेशा की तरह क्रोएशिया के लोग इसे धूमधाम से मनाएंगे।*

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा क्रोएशियाचा ऐतिहासिक दौरा मैत्री, सहकार्य आणि सामायिक जागतिक दृष्टिकोनाचा मजबूत संदेश देऊन यशस्वीपणे संपन्न झाला.

---------------------------------------

**योगा-एनसीसी**

राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) नागपूर ग्रुपने आज आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या प्रारंभिक समारंभाला सुरुवात केली. आर्मी, आर अँड व्ही, नेव्ही आणि एअर फोर्सच्या शाखांमधील ५०० हून अधिक एनसीसी कॅडेट्सनी उत्साहाने योग सत्रात भाग घेतला. हा कार्यक्रम उमंग सब एरिया सीताबर्डी फोर्ट आणि झिरो माईल फ्रीडम पार्क मेट्रो स्टेशन, नागपूर इथं पार पडला.

---------------------------------------

**QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारी**

QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत ५४ भारतीय शैक्षणिक संस्थांना स्थान मिळालं आहे. यामध्ये इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी-IIT मुंबई या शैक्षणिक संस्थेनं देशात दुसरा क्रमांक मिळवला आहे. या क्रमवारीत आयआयटी मुंबईला १२९वा क्रमांक मिळाला आहे. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी-IIT दिल्ली या शैक्षणिक संस्थेनं १२३वा क्रमांक मिळवत देशातून पहिला क्रमांक पटकावला आहे. या संस्थेला आजवर मिळालेली सर्वोच्च QS जागतिक क्रमवारी आहे. या आधी ही संस्था १५० व्या स्थानी होती. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधून ५४ भारतीय शिक्षण संस्थांनी QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्थान मिळवल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. २०१४ मध्ये केवळ ११ भारतीय विद्यापीठांना QS क्रमवारीत स्थान होतं आता या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या शैक्षणिक सुधारणांचं फलित असल्याचं प्रधान यांनी नमूद केलं.

---------------------------------------

**फडणवीस**

राज्यातील महत्वाच्या सर्व प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार मार्गी लावावेत. भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्या. राज्यातील महत्वाच्या प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी घेतला. यावेळी नागपूर - गोवा शक्तिपीठ महामार्ग, भंडारा- गडचिरोली द्रुतगती महामार्ग, नागपूर - चंद्रपूर द्रुतगती महामार्ग, नागपूर -गोंदिया द्रुतगती महामार्ग, नवेगाव (मोर)- सुरजागड मिनरल कॅरिडोर, यासह राज्यातील रस्ते प्रकल्पांच्या भूसंपादनाचा तसेच वर्धा-नांदेड, वर्धा-गडचिरोली रेल्वे प्रकल्प आणि कोल्हापूर, कराड, अकोला, गडचिरोली आणि

छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळाच्या भूसंपादनाचा सविस्तर आढावा घेतला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भूसंपादनाच्या प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणांना टाईमलाईन दिलेली आहे. त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे. सर्व यंत्रणा आणि संबंधित अधिकारी यांनी मिशन मोडवर काम करावे. याबाबत सर्वांनी गुणात्मक आणि रचनात्मक काम करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

-------------------------------------

विधी सहाय्य

कारागृहांमधील विचाराधीन बंद्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २०१८ मध्ये सुरू केलेल्या देशातील पहिल्या विधी सहाय्य उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे जवळपास २० हजार विचाराधीन बंद्यांना लाभ झाला आहे. त्यापैकी ९ हजार म्हणजेच ४५ टक्के बंदी विविध कायदेशीर प्रक्रियांद्वारे मुक्त करण्यात आले आहेत. या उपक्रमाचे महत्व म्हणजे, केंद्र शासनाने देश पातळीवर हा उपक्रम स्वीकारला असून अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूदही केली आहे.

-------------------------------------

आशीष शेलार

राज्यात प्रयोगात्मक कलांचं सखोल संशोधन आणि अभ्यास करता यावा म्हणून राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पु. ल. देशपांडे कला अकादमीत स्वतंत्र संशोधन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या केंद्राला शाहीर साबळे यांचं नाव देण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी आज दिली. मुंबईत मंत्रालय सांस्कृतिक कार्य विभागाकडे नाटक, लोककला, संगीत, नृत्य अशा विविध प्रयोगात्मक कलांची माहिती उपलब्ध आहे.

-------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

'जिवंत सातबारा' मोहिमेला अमरावती विभागात चांगला प्रतिसाद मिळाला असून, यामुळे मृत खातेदारांच्या वारसांना मोठा दिलासा मिळाला आहे. वारसांची नोंद शेतजमिनीच्या कागदपत्रांमध्ये, विशेषतः सातबारा उताऱ्यावर, वेळेत न झाल्यामुळे येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी ही मोहीम अत्यंत प्रभावी ठरली आहे. या यशस्वी उपक्रमाबद्दल सामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांनी महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरू केलेल्या मोहिमेबद्दल आभार मानले आहेत. अमरावती

विभागातील 56 तालुक्यांमध्ये एकूण 32 हजार 195 खातेदार मृत असल्याचे निदर्शनास आले. यापैकी तब्बल 19 हजार 150 वारसांच्या नावे यशस्वीपणे नोंद घेण्यात आली आहे. 'जिवंत सातबारा' मोहिमेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या कागदपत्रांबाबत समस्या दूर होण्यास मदत होत आहे.

---------------------------------------

मारुती चितमपल्ली

ख्यातनाम वन्य जीव अभ्यासक, पद्‌मश्री पुरस्कार प्राप्त मारुती चितमपल्ली यांच्या पार्थिवावर आज सोलापूर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. चितमपल्ली यांचं काल संध्याकाळी वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. जंगल आणि वन्य प्राण्यांवर प्रेम करणारे चितमपल्ली यांना 'अरण्यऋषी' म्हणून ओळखलं जातं. चितमपल्ली यांनी महाराष्ट्र सरकारच्या वन विभागात ३६ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा केली. कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्‌यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यासारख्या विविध जंगलांमध्ये आणि राष्ट्रीय उद्‌यानांमध्ये त्यांनी काम केलं. वन्यजीव संरक्षणात त्यांनी मोठं योगदान दिलं. नागझिरा आणि मेळघाट इथल्या विस्थापित वन्यजीवांसाठी अनाथाश्रम उभारायला त्यांनी मदत केली. मारुती चित्तमपल्ली यांचं साहित्य मुख्यतः मराठी भाषेत असून ते वन्यजीव, निसर्ग आणि आदिवासी जीवनावर केंद्रित आहे. पक्षीविज्ञान आणि वन्यजीवनाशी संबंधित अनेक नवीन शब्द आणि संज्ञा त्यांनी मराठी भाषेत आणल्या. अनेक पक्षी-शास्त्रीय संकल्पनांना त्यांनी मराठी नावं दिली. "चकवा चांदणं" ही त्यांची आत्मकथा प्रसिद्‌ध आहे. त्याशिवाय, निलवंती, जंगलाचं देणं, रातवा, रानवाटा, केशराचा पाऊस, सुवर्ण गरुड या काही त्यांच्या लोकप्रिय साहित्यकृती आहेत.

---------------------------------------

हवामान

आगामी काही तासात  वादळ आणि विजांच्या कडकडाटासह विदर्भातील वाशीम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाची शक्यता  नागपूरच्या हवामान विभागाने वर्तवली आहे.

---------------------------------------

नदीची स्वच्छता

नागपूरच्या के.डी.के अभियांत्रिकी महाविद्‌यालयाजवळ असलेल्या पिवळी नदी आणि नाग नदीच्या संगमाच्या पुढे नदीची स्वच्छता, खोलीकरण आणि रुंदीकरण नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्याने नागपूर महानगर

**प्रादेशिक विकास प्राधिकरणाने करावे असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी या भागाची नुकतीच पाहणी केली.**

**---------------------------------------**